International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor – 0.899
Vol.5 No.5 May– June 2018

# स्वातंत्र्योत्तर काळातील कोल्हापूर जिल्ह्यातील दलित राजकीय कार्यकर्ते

**श्री. गौतम हरी आळतेकर**
**सहयोगी प्राध्यापक, श्री शिव–शाहू महाविद्यालय,**
**सरूड, ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**

कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांचा राजकीय बदल समजून घेण्यासाठी काही निवडक मान्यवर दलित राजकीय नेत्यांच्या चर्चा वजा मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतींतून, त्यांनी दलितांसाठी कसे भरीव कार्य केले आहे ते लक्षात घेतले गेले. तसेच, त्यांच्या कार्याच्या माहितीवरुन, एकंदर दलितांमध्ये कसा राजकीय बदल होत गेला ते ही लक्षात आले.

**मा. जयवंतरावजी आवळे :**

कोल्हापूर जिल्ह्यातील पहिले कॅबिनेट मंत्री, पाचवेळा आमदार, एक वेळा खासदार व पन्नास वर्षे ज्यांनी कोल्हापूर व महाराष्ट्र आणि भारताच्या राजकारणामध्ये स्वत:चा दबदबा निर्माण केला व ज्यांच्या पन्नास वर्षाच्या राजकीय कारर्किदीबाबत एक ही डाग नाही असे दलित समाजातील काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते म्हणजे जयवंतराव आवळे होय. यांचा जन्म सर्वसामान्य घरामध्ये झाला. याचे आई—वडील सुरूवातीला पारंपरिक व्यवसाय करीत होते. पुढे मुले मोठी झाल्यावर त्यांनी शेतीचा व्यवसाय सुरू करून त्यामध्ये यश मिळविले. जयवंतराव सोडून सर्व भाऊ वडीलांना शेतीमध्ये मदत करू लागले. यामुळे हळूहळू प्रगती होत जाऊन अर्थिक परिस्थितीमध्ये बदल झाला. जयवंतराव सर्वात लहान असल्यामुळे ते घरात लाडके होते. म्हणून त्यांना शिक्षणासाठी सर्व जणांनी प्रोत्साहन दिले. जयवंतरावांच्या आई—वडीलांना जयवंतराव हे शेवटचे अपत्य होय. जयवंतराव आवळेसाहेबांचे वडील गंगाराम हे जरी अशिक्षित असले तरी त्यांनी आपल्या सर्व मुलांच्याकडे चांगले लक्ष दिले. मुलांच्यावर वाईट संस्कार होवू नयेत म्हणून त्यांनी घरामध्ये तालिम बांधली आणि त्यामध्ये सराव करू लागले. त्याकाळामध्ये हे कुटुंब एकत्र होते. एकूण पन्नास सदस्य या कुटुंबात होते. त्यांच्या घरी पंधरा म्हैशी होत्या. दिवसभर त्यांची आई व सुना स्वयंपाकमध्ये व्यस्त राहायच्या.

जयवंतराव आता कॉलेजमध्ये गेले व त्याच वेळी इचलकरंजी नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली. आपल्या गल्लीतील मुलगा चांगला शिकला आहे असा विचार करून गल्लीतील लोकांनी जयवंतरावांना इ.स. १९६२ ला निवडणुकीला उभे केले व निवडूनही आणले. वास्तविक पाहता गंगाराम आवळेंचा याला विरोध होता. त्यांचे मत असे होते की जयवंत अजून लहान आहे. अशाप्रकारे इ. स. १९६२ पासून जयवंतरावांच्या राजकीय प्रवसाला इचलकरंजीच्या नगरपालिकेच्या राजकारणापासून सुरूवात झाली. यावेळी त्यांनी कष्टकरी, दलित, मजूर, कामगार, हमाल, झोपडपट्टी यांच्या संघटना उभारून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. असा जयवंतरावांचा राजकीय प्रवास सुरू असतानाच इ. स. १९७८ च्या दरम्यान काँग्रेसमध्ये फूट पडून इंदिरा गांधींनी इंदिरा काँग्रेसची स्थापना केली. इचलकरंजीमध्ये जयवंतराव आवळेंनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने पक्षाची शाखा स्थापन केली व काँग्रेस पक्षाची धुरा आपल्या खांद्यावर

घेतली इ. स. १९७८ ते आतापर्यंत जयवंतराव आवळे हे महाराष्ट्रातील एकमेव काँग्रेसचे नेते आहेत की त्यांनी शेवटपर्यंत काँग्रेस सोडले नाही की कधी पक्षांशी गद्दारी केली नाही. यामुळेच पक्षाचा पाच वेळा आमदार, एक वेळा खासदार व महाराष्ट्र राज्याचे कॉबनेट मंत्री म्हणून काँग्रेस पक्षाने संधी देवून प्रामाणिक कार्यकर्त्याचा गौरव केला.

इ. स. १९८०ला महाराष्ट्र शासनाच्या विधानसभेच्या निवडणूका जाहीर होऊन वडगाव राखीव मतदारसंघातून काँग्रेस पक्षाने जयवंतराव आवळेंना तिकीट दिले. वास्तविक पाहता आवळेसाहेबांनी इचलकरंजी मतदारसंघातून पक्षाकडे तिकीट मागणीकेली होती. पक्षाअंतर्गत तडजोड होऊन त्यावेळच्या महाराष्ट्राच्या प्रदेशाअध्यक्षा सौ. प्रमिलाकाकी चव्हाण यांनी इचलकरंजीमधून श्री. बाबासाहेब खंजीरेंना व वडगावमधून जयवंतराव आवळेंना विधानसभेचे तिकीट जाहिर केले. वास्तविक पाहता जयवंतरावांचा आणि वडगावमतदार संघाचा काहीच संबंध नव्हता. तरी सुध्दा जयवंतरावांनी पक्ष कार्यकर्त्यांच्या जोरावर २४,१७५ मताधिकाऱ्याने सर्व विरोधकांची डिपॉझीट जप्त करून ते आमदार झाले. इथून पुढे त्यांनी सतत २००४ पर्यंत या मतदारसंघाचे नेतृत्त्व केले व या मतदारसंघाचा चेहरा—मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला.

पुढे १९९९ च्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये मा. विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले. तेव्हा विलासरावांचे जवळचे मित्र जयवंतराव आवळे हे समाज कल्याणचे कॅबिनेट मंत्री झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील पहिले कॅबिनेट मंत्री म्हणून जयवंतराव आवळेंनी शपथ घेतली. यावेळी विलासराव देशमुखांनी जयवंतरावाना सांगितले की तुमच्या विभागाचे बजेट हे २४ हजार कोटीचे आहे. ते कधीच मुद्दाम खर्ची टाकले जात नाही. तुम्ही विशेष लक्ष घालून हे बजेट तुमच्या समाजाच्या कल्याणासाठी वापरा. यामुळे जयवंतराव आवळेंनी पाच वर्षे मागे वळून न पाहता समाज विकासाच्या योजनांचा धडाका सुरू केला. यामध्ये दलित विद्यार्थांची शिष्यवृत्ती दुप्पट केली. परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या दलित मुलांमुलींचा संपूर्ण खर्च उचलला, दलित मित्र पुरस्काराची संख्या दुप्पट केली. खास अनुशेषसाठी मोहीम काढून सर्व विभागामधला मागासवर्गाचा अनुशेष भरून काढला. खास म्हणजे दलित तरूणांना उद्योजक बनविण्यासाठी खास कायदे पास करून घेतले व साखर कारखाने, खानसऱ्या, प्रोसेस, गारमेंट मिल, कापड मिल, पॉवर माग, सायझींग, वापिंग व इतर उद्योगांना परवानगी देवून अर्थसहाय्यही केले.

याशिवाय जी मागास वर्गीय महामंडळे बंद पडली होती ती पुन्हा चालू करून या महामंडळाच्या माध्यमातून दलितांना व इतर मागासांना छोट्या छोट्या उद्योगासाठी अर्थपुरवठा केला. अशा पद्धतीने या पाच वर्षाच्या काळामध्ये जयवंतराव आवळेसाहेबांनी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर करून महाराष्ट्रातील दलित समाजाला शासनाच्यावतीने भरघोस आर्थिक मदत करून प्रगतीचा मार्ग दाखविला व दलितांच्या उद्धारांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार काँग्रेसच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

मतदारसंघामध्ये पंचवीस वर्षाच्या काळात गोरगरीबांना घरे, रस्ते, गटारी, पाण्याची सोय, मंदिरे, शेतकऱ्यांना कर्जमाप व मदत, कामगारांना मदत, रोजगार हमी योजनेखाली कामे, वेगवेगळया आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून मागासांच्या उद्योगाला व व्यापाराला प्रोत्साहन ही सर्व कामे प्रत्येक गावामध्ये केली. या शिवाय मतदारसंघांतील तरूणाच्या हाताला रोजगार देण्यासाठी महात्मा फुले सुतगिरणी, खानसरी, प्रोसेस, गारमेंट, कारखाना, सायझिंग, पावरलुम व शिक्षण संस्था काढून हजारो कुटुंबाला रोजगार मिळवून दिला.

गेली पन्नास वर्षे ते राज्याच्या आणि देशाच्या राजकारणामध्ये आहेत. असे असले तरी त्याच्यावर त्यांचे विरोधकसुध्दा भ्रष्टाचाराचा अरोप करू शकत नाहीत. एवढे स्वच्छ

चरित्र जयवंतरावजींचे आहे. ते १९६७ पासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहेत. म्हणून पक्षाने सुद्धा त्यांना मोठ मोठी पदे देवून त्यांचा एक प्रकारे सत्कारच केला. त्यांचे दलितांच्या राजकारणाविषयी असे मत आहे की, 'जर दलितांना डॉ. बाबासाहेबांचे स्वप्ने पूर्ण करावयाचे असेल तर सर्व एस. सी., ओ. बी. सी., एस. टी. यांनी एकत्र येवून काँग्रेससारख्या पक्षाला पाठींबा देऊन सत्तेत भागीदार झालो पाहिजे व शासन चालविणारी जमात बनले पाहिजे, याचबरोबर सामाजिक क्षेत्राच्याबाबत कोल्हापूर जिल्ह्यातील सुखी आहे. तो आपली सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. त्यामुळे हा समाज बदलत आहे व याची नोंद सरकारने सुद्धा घेतली पाहिजे.'

**मा. आ. राजीव आवळे :**

वडगाव राखीव मतदार संघातून जनसुराज्य पक्षाच्या तिकिटावर इ.स. २००४ च्या महाराष्ट्र राज्य विधान सभेच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये ६७,४८९ एकूण मते घेवून आपल्या विरोधकावर १११३ मतांनी आघाडी घेवून निवडून आलेले तरूण तडपदार व उच्च शिक्षीत आमदार म्हणजे राजीव किसन आवळे होय. आवळेसाहेबांचा जन्म इ. स. १९७२ चा. त्यांचे वडिल एक गुणी पैलवान म्हणून आदंळकरांच्या ग्रुपमध्ये कोल्हापूरात प्रसिध्द होते. पुढे किसनराव आवळेंनी हातमागाच्या व्यवसायामध्ये लक्ष घातले व पत्नीच्या सहकार्याने ते त्यामध्ये यशस्वी झाले. ते मागासवर्गीय दलित असले तरी एक उद्योजक म्हणून इचलकरंजीमध्ये नावारूपाला आले. त्यामुळे किसनरावांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली. त्यांनी याकाळात कोल्हापूर जिल्हयातील मातंग समाजाला एकत्रित करण्याचा प्रयत्न करून मातंग वसाहतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आण्णा भाऊ साठे यांच्या जयंती साजरी करू लागले. याकामी त्यांना प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, प्रा. सुकुमार कांबळे हे मदत करत होते. तसेच प्रा. लक्ष्मणराव ठोकळे, प्रा. जोगेंद्र कवाडे व रामदास आठवले ही मंडळीसुद्धा कोल्हापूरच्या दौऱ्यावर आली की, किसनरावांच्याबरोबर ही मंडळी असायची. यावेळी जिल्ह्यातील राज्यातील व देशातील दलितांच्या एकूणच परिस्थितीविषयी चर्चा व्हायची. हे सर्व राजीव आवळेंच्या समोरच घडायचे. एकूणच वडिलांच्या दलित सुधारणा प्रयत्नामुळे राजीव आवळे सुद्धा विद्यार्थी दशेमध्येच समाज व राजकारणाकडे वळले. राजीव आवळेंच्या कॉलेज जीवनामध्ये N. S. U. I. मध्ये कार्यरत होते. इचलकरंजीमध्ये विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून ते पुढे आले. याचा फायदा ते तरूण असतानाच झाला व आवाडे गटाकडून ते इचलकरंजीचे नगरसेवक पदापासून नगराध्यक्ष पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या वडिलांची इच्छा एवढ्या लवकर राजकारणामध्ये नको, अशी होती. पण राजीवजींनी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून इचलकरंजीमध्ये कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले होते. त्यामुळे कार्यकर्त्यांनाच आता राजकारणामध्ये राजीवजींनी प्रवेश केला पाहिजे, असे वाटू लागले. या कार्यकर्त्यांच्या व आवाड्यांच्यामुळे राजीवजींनी प्रथम नगरसेवक व नंतर नगराध्यक्ष झाले.

राजीवजी नगराध्यक्ष झाले. तेव्हा आयुक्त म्हणून शिवमुर्ती नाईकसाहेब होते. या दोघांनी मिळून इचलकरंजीमधील दलित पिढीत–शोषित समाजासाठी भरपूर काम केले. यामध्ये झोपडपट्टीधारकांचे पूर्नवसन करून त्यांना पक्की घरे बांधून दिली. वेश्यांचा प्रश्न त्यांनी अतिशय कुशलतेने सोडविला. त्यांचा व्यवसाय अचानक बंद करून देशोधडीला न लावता, वेश्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करून तसेच प्रत्येक वेश्या स्त्रीशी वैयक्तिक चर्चा करून त्यांना छोट–छोटे उद्योग काढून दिले व हा प्रश्न नगराध्यक्षसाहेबांनी अतिशय शांतपणे सोडवून इचलकरंजी शहरातून हा व्यवसाय हद्दपार करण्याचा प्रयत्न केला.

आता एकट्या दलित समाजाला घेऊन सत्ता संपादन करण्याचे दिवस गेले. ते शक्यही नव्हते आणि स्वतंत्र भारतामध्ये जातीच्या नावाने राजकारण करणे हे योग्यही नव्हते तसे ते भारतीय लोकशाहीला मारकही होते. म्हणूनच स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा शे. का. फे. पक्ष बरखास्त केला होता व त्याच्या जागी 'रिपब्लिकन पक्ष' जो सर्वसमावेशक असा असेल तो स्थापन करण्याचा विचार केला होता. आता राज्यातील दलित नेते असाच विचार करू लागले. यातूनच प्रा. लक्ष्मणराव ढोबळेंनी बहुजन रयत परिषद स्थापन करून साऱ्या महाराष्ट्रभर याच्या शाखा स्थापन केल्या आणि सर्व बहूजनवर्गाला यामध्ये सामिल होण्याचे आवाहन केले. कारण बहुजनांच्या हाती सत्ता आल्याशिवाय गोर—गरीब, दिन—दलितांचे प्रश्न सुटणार नव्हते. इचलकरंजी व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राजीवजींच्या नेतृत्त्वामध्ये बहुजन रयत परिषदेच्या शाखा स्थापन होवून यामध्ये दलित, ओ. बी. सी., व मुसलमान मंडळी काम करू लागली. कोल्हापूरच्या राजकीय व सामाजिक जीवनाला एक वेगळी दिशा मिळू लागली व यातून राजकीय व सामाजिक बदलाची चाहूल लागली.

अशापद्धतीने काँग्रेस, बहुजन रयत परिषद या पक्षांच्या व संघटनांच्या माध्यमातून राजीवजींना कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आपल्या कार्यकर्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण केले. अशा परिस्थितीमध्ये इ. स. २००४ च्या राज्याच्या निवडणूका जाहीर झाल्या. याच दरम्यान वारणेच्या कोरेसाहेबांनी जनस्वराज्यशक्ती या नावाने नवीन पक्षाची स्थापना केली होती. त्याच दरम्यान, विनायकराव कोरे व राजीवजी यांचा संपर्क येऊन वडगाव राखीव मतदार संघातून जनस्वराज्य शक्ती पक्षातर्फे राजीव आवळेंना तिकिट दिले. राजीव आवळेंचे स्वतचे नेटवर्क व कोरेसाहेबांची ताकद यामुळे या निवडणूकीमध्ये मोठी क्रांती होवून ११३३ मतांनी राजीव आवळे निवडणूक आले. राजीवजींनी विद्यार्थी दशेपासून जे सर्वधर्मसमभावाचे राजकारण व समाजकारण केले होते त्याची ही पोचपावती होती.

आमदार झाल्यानंतर राजीवजीसाहेबांनी अतिशय नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेतला. यामध्ये 'आमदार आपल्या दारी' ही योजना पहिल्यांदाच मतदारसंघात राबवून त्या गावाच्या समस्या जाणून घेतल्या व आपल्या काळात त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. वडगाव मतदारसंघामध्ये दलितांच्या घरोघरी स्वत: व कार्यकर्त्यांच्या मार्फत पोहचून, आधिकाऱ्यांना बरोबर घेऊन, मागासवर्गीयांसाठी ज्या सरकारी योजना आहेत त्या योजनांची माहिती दलित समाजाला दिली व जास्तीत—जास्त फायदा दलित समाजाने घ्यावा यासाठी प्रयत्न केले. नेहमीप्रमाणे रस्ते, लाईट, पाणी इकडे त्यांनी खास लक्ष पुरविले. तसेच अनुसुचित जाती—जमातीचा अनुशेष भरून काढण्यासाठी विधीमंडळामध्ये सतत आवाज उठविला. राजीवजींचे विधीमंडळातील महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी मु. पो. माणगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर हे एक राष्ट्रीय स्मारक व्हावे, यासाठी खास प्रयत्न केले व ते मंजूर करून घेतले. याशिवाय आमदार राजीव आवळेसाहेबांनी वडगाव मतदार संघातील जि. प. च्या सहावी व सातवीतील २०० मुला—मुलींना अधिवेशनाच्या काळात मुंबईला नेऊन महाराष्ट्र राज्याचा कारभार कसा चालतो, हे पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली होती, हा संपूर्ण खर्च त्यांनी स्वत: केला होता.

अशाप्रकारे संपूर्ण पाच वर्षाच्या काळामध्ये आमदार राजीव आवळेसाहेबांनी आपल्या मतदार संघातील सवर्ण समाजाबरोबरच दलित समाजाला जास्तीत—जास्त आपल्या आमदारांचा कसा फायदा होईल, यासाठीच प्रयत्न केला. एकूणच आपल्या काळामध्ये राजीवजीसाहेबांनी वडगाव मतदार संघाबरोबरच संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांच्या, सामाजिक व राजकीय जीवनामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. दलित तरूणांना नोकरीच्या संधी सांगण्यासाठी गावोगावी मेळावे घेतले व दलित तरूणांना

रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. आवळेसाहेबांच्या मते कोल्हापूर जिल्ह्यातील दलित समाज सामाजिक व राजकीयदृष्ट्या बदलत आहे.

**आमदार डॉ. सुजित मिणचेकर :**

कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव—हातकणंगले राखीव मतदार संघातील अभ्यासू, तरूण व तडफदार आमदार म्हणजे डॉ. सुजीत वसंतराव मिणचेकर होय. डॉ. मिणचेकरांचा जन्म एका मध्यवर्गीय कुटुंबामध्ये इ. स. १९७० ला झाला. त्यांचे आई—वडील पेशाने शिक्षक असल्यामुळे घरातील वातावरण शिस्तीचे होते. वडील शिक्षक असले तरी त्यांच्या सामाजिक व राजकीय प्रश्नांची जाणीव होती ते एक चांगले शिक्षक व आंबेडकरी समाजाचे कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध होते. सहजिकच वसंतरावमामांची इच्छा वडगावचे आमदार होण्याची होती ती इच्छा त्यांच्या मुलाने वडील जिवंत असताना पूर्ण केली त्यामुळे मामांना फारच आनंद झाला.

डॉ. सुजीत मिणचेकरसाहेब हे घरातील वातावरणामुळे विद्यार्थीदशेपासूनच चळवळीमध्ये काम करत होते. त्यांनी अनेक विद्यार्थी संघटनेत काम केले आहे. संघटना कोणतीही असो. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम केले आहे. मुंबईमध्ये वैद्यकिय विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुंबई व दिल्लीपर्यंत धडक मारून विद्यार्थ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्याच्या प्रयत्न केला. यामुळेच डॉ. मिणचेकरांना विद्यार्थी असतानाच डेंण्टल विभागाचे संचालक व मुंबई विद्यापीठाचे सिनेटर ही पदे मिळाली, अशापद्धतीने विद्यार्थी दशेपासूनच डॉ. मिणचेकरांच्या राजकीय कार्याला सुरवात झाली.

इ. स. १९८७ पासून राजकीय कारकिर्दीला सुरवात करून, त्यांनी २००३ ला शिवसेनेत प्रवेश केला व अखिल महाराष्ट्रामध्ये शिवशक्ती व भीमशक्ती एकत्र आली पाहिजे असे त्यांनी मा. उद्धवरावजी ठाकरेंना पटवून दिले. पुढे ते याच समीकरणावर आमदार झाले.

आमदार झाल्यानंतर सत्ता विरोधकांची होती तरी सुध्दा वडगाव हा जो मागास मतदार संघ आहे या मतदार संघाला जास्तीत—जास्त पुढे घेवून जाऊन इथल्या तरुणांसाठी रोजगार कसा निर्माण होईल, यासाठी प्रयत्न करू लागले. यामध्ये आपल्या मतदारसंघामध्ये तरुण मुलांच्या हाताला काम मिळविण्यासाठी टेक्सटाईल पार्क, इंडस्ट्रीज ईस्टेट, इंटरनॅशनल स्कूल उभारून डॉ. मिणचेकर तरुणांच्या हाताला रोजगार देऊ पहात आहेत. तसा त्याचा सरकार दरबारी जोरात प्रयत्न सुरू आहे. याचबरोबर दलित तरुणांना उद्योजक बनविण्याचा ही प्रयत्न त्यांचा सुरू आहे व यामध्ये त्यांना यश येत आहे. हातकणंगले तालुक्यामध्ये हे सर्व करण्याचे काम सुरू आहे.

आंबेडकरी राजकारणावर बोलताना ते म्हणतात की महाराष्ट्रामध्ये आणि कोल्हापूरमध्ये जेवढे दलित नेते आहेत तेवढे पक्षाचे गट आहेत. त्यामुळे आता आंबेडकरी पक्षातून निवडणूक लढवून सत्ता मिळविणे हे फारच अशक्य आहे. त्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या बलाढ्य पक्षाच्या माध्यमातून दलितांनी निवडणूक लढवावी अथवा त्या पक्षाच्या पाठीमागे ताकद लावून आपण निवडून यावे किंवा आपल्याला पहिजे तो उमेदवार निवडून आणावा व राज्याची आणि देशाची सत्ता आपल्या हाती घ्यावी. अशा प्रकारे शासनाकर्ती जमात बनून डॉ.बाबासाहेबांचे जे स्वप्न होते ते स्वप्न पूर्ण करावे. जिल्ह्याच्या राजकारणावर बोलताना ते म्हणाले की गेल्या ६० वर्षापेक्षा अलिकडे, जिल्ह्याचे राजकारण चांगले बदलत आहे. यामुळे दलितांना न्याय मिळून जिल्ह्यातील दलितांची ही प्रगती होत

आहे, विकास होत आहे व दलित हे कोल्हापूरच्या राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे कोल्हापूरचे दलित राजकीयदृष्ट्या बदलत आहेत.

सामाजिकदृष्ट्या चर्चा करताना म्हणाले की, कोल्हापूर जिल्ह्याला शाहू—फुले—आंबेडकर यांच्या विचाराची परंपरा आहे. त्यामुळे गेल्या ६१ वर्षांमध्ये इतर जिल्ह्यांपेक्षा कोल्हापूर जिल्ह्यांतील दलित सुखी, समृध्द व सुरक्षित आहेत. इतर जिल्ह्यामध्ये दलितांवर अजूनही अन्याय, अत्याचार होतच आहेत. याला कोल्हापूर जिल्हा अपवाद आहे. इ. स. २००० नंतर काही एखादी घटना वगळली तर कोल्हापूर जिल्हा सामाजिकदृष्ट्या शांत आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांचा सामाजिकदृष्ट्य सुद्धा फार मोठा बदल झाला आहे. आज आम्ही सवर्ण समाजाच्या खांद्याला—खांद्या लावून कामे करतो. समाज बदल रहा है, देश बदल रहा है और कोल्हापूर जिल्हा भी बदल रहा है’.

डॉ. सुजीत मिणचेकरांनी मतदार संघातील दलित तरुणांना असा संदेश दिला आहे की शिक्षण घ्या आणि नोकऱ्या मिळवा; उद्योगपती व्हा, व्यापारी व्हा, कुटुंबाचा आर्थिक आधार बना. समाजाला आधार द्या व योग्य परिस्थिती असेल तर एक करिअर म्हणून राजकारणाचा सुध्दा विचार करा.

**प्रा. शहाजी कांबळे :**

कोल्हापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील तिसऱ्या पिढीचे तरुण, तडफदार, मनमिळावू, अभ्यासू आणि समाजप्रिय एक राजकीय नेतृत्व आणि आर. पी. आय. आठवले गटाचे प्रमुख नेते म्हणजे प्रा. शहाजी कांबळे होय. प्रा. शहाजी कांबळे यांचा जन्म इ. स. १९६६ ला राशिवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे वडील साताप्पा कांबळे हे भोगावती साखर कारखान्यामध्ये शेती विभागात नोकरीला होते. त्यांची आई फुलाबाई व साताप्पा कांबळे यांच्यावर आंबेडकरी विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे शहाजी कांबळे सर लहानपणापासूनच घरामध्ये दलित समाजाच्या वडिलाच्या व चुलत्यांच्या नेतृत्त्वाखाली ज्या मिटिंगा व्हायच्या त्या पहात असत. बऱ्याच वेळा कुठल्यातरी गावातील दलित समाजावर अन्याय अथवा अत्याचार झाला किंवा दलित समाजावर बहिष्कार टाकला असला तर साताप्पा कांबळेंच्या घरी याबाबत भागातील दलितांची मिटींग होत असे. या वेळी या मिटिंगला लोकांना बोलाविण्याचे काम लहान शहाजीला करावे लागत होते. म्हणजे लहानपणापासूनच प्रा. शहाजी कांबळे सर हे अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आंबेडकरी चळवळीकडे आकर्षित झालेले आपल्याला दिसतात.

विद्यार्थी असतानाच प्रा. शहाजी कांबळे यांनी शासकीय हॉस्टेल संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांना योग्य व नियमानुसार आहार व जेवण मिळावे म्हणून इ. स. १९८० ला आंदोलन केले व आपल्या सहकाऱ्यांना न्याय मिळवून दिला. म्हणजेच कांबळेसरांचे सामाजिक कार्य हे विद्यार्थीदशेमध्येच सुरू झालेले आपल्याला दिसते.

करवीर तालुक्यामध्ये आमशीचे प्रकरण मोठे गाजले होते. या प्रकरणानंतर सर्वच तालुक्यामध्ये कमी जास्त प्रमाणात दलितांच्यावर अन्याय, अत्याचार सुरू झाले होते. याची झळ ही राधानगरी तालुक्याला सुद्धा बसली व भोगावती भागामध्ये दलितांवर सामाजिक बहिष्कार टाकला गेला. यावेळी माणसाच्याबरोबर जनावरांचेही हाल होवू लागले. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी प्रा. शहाजी कांबळे सरांच्या वडिलांनी राशिवडे व आजूबाजूच्या गावातील दलितांचा मोर्चा कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी

कार्यालयावर जनांवरांसह काढला. या मोर्चामध्ये जनावरे हाकायचे काम लहान असणाऱ्या शहाजीने केले होते हे विशेष नमूद करण्यासारखे आहे.

शहाजी कांबळेसर कोल्हापूरमध्ये शिकत असल्यामुळे तसेच घरच्या वातावरणामुळे ते सामाजिक कार्याकडे आकर्षित झाले. यावेळी समाजवादी, दलित पँथर व आर. पी.पी. आय. आणि सर्व डावे यांच्याशी त्यांचा वारंवार संबंध येऊ लागला. यातूनच राज्यपातळीवरील दलितांच्या चळवळीमध्ये प्रा. शहाजी कांबळे भाग घेऊ लागले.

रिडल्सचा संघर्ष, नामांतराचा संघर्ष, घाटकोपरचा संघर्ष, खैरलांजी संघर्ष तर परवाचा कोल्हापूर जिल्ह्यातील वडिग्यांचा संघर्ष या सर्व संघर्षामध्ये सरांनी आपल्या संघटनेच्या व पक्षाच्या माध्यमातून झोकून देऊन महाराष्ट्राबरोबर, कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

जर खऱ्या—अर्थाने दलितांच्या जीवनामध्ये स्पुल्लींग निर्माण करावयाचा असेल तर राजकारणाशिवाय पर्याय नाही. राजकारण हे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे मूळ आहे. ती समाजाच्या बदलाची गुरूकिल्ली आहे. असा विचार करून प्रा. शहाजी सरांनी इ. स. १९९० पासून आठवले साहेबांच्या गटात प्रवेश करून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरवात केली. राधानगरी तालुका संघटक ते आता पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष असा चढता आलेख सरांनी राजकारणामध्ये गाठला आहे. आंबेडकरी समाजासाठी आज आंबेडकरी राजकारण करून व वेळोवेळी वेगवेगळ्या पक्षाबरोबर युती करून प्रा. शहाजी कांबळे सरांचे राज्याचे व जिल्ह्याचे राजकारण चालू आहे. राजकारणाच्या या वीस वर्षांच्या काळामध्ये प्रा. शहाजी सरांनी राजकारण कमी करून त्यामध्ये समाजकारणच मोठ्या प्रमाणात केले आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींचा त्यांच्यावर मोठा विश्वास आहे.

आज प्रा. शहाजी कांबळे सरांनी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आर. पी. आय. गटाची ताकद मोठी वाढविली आहे. ज्या पक्षांशी युती देश व राज्य पातळीवर होते. त्या पक्षावर जिल्ह्यात आर. पी. आय. आठवले गटाचा दबदबा निर्माण करण्यामध्ये प्रा. शहाजी कांबळे सर व त्यांचा संपूर्ण गट यशस्वी झाला आहे. प्रा. शहाजी कांबळे सरांच्या पाठिमागे खंबीरपणे त्यांचे सहकारी, उत्तमदादा कांबळे, मंगलराव माळगे, ॲड. पंडितराव सडोलीकर, प्रा. कृष्णात किरवले, प्रा. संजय जिरगे, शामप्रसाद कांबळे, डॉ. अनिल माने, सुखदेव बुध्याळकर तसेच महिला कार्यकर्त्या रुपा वायदंडे, अर्चना कांबळे, नंदाताई माहिते, अर्चना गणेशचार्य, रंगूताई कांबळे ही सर्व मंडळी उभी आहेत. याचाच परिणाम कोल्हापूरच्या राजकारणांवर होऊन, स्थानिक निवडणुकीच्यावेळी ज्या पक्षांशी युती होते तो पक्ष प्रा. शहाजी कांबळेसरांना बरोबर घेतल्याशिवाय निवडणुकीची राजकीय व्यूव्हरचना तयारच करू शकत नाही. एवढा मोठा दबदबा कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आठवले गटाचा निर्माण करण्यामध्ये प्रा. शहाजी कांबळे व त्यांचे सर्व सहकारी यशस्वी झाले आहेत.

दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांची कुटुंबे चालावी, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून प्रा. शहाजी कांबळे सरांनी रिपब्लिकन सोशल फेडरेशन, रिपब्लिकन टुडे, रामदास स्टील उद्योग, लोरी आयुर्वेदिक इ. या उद्योग समुहाच्या माध्यमातून सुमारे २५० कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच सुमारे शंभर एक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री योजनेतून प्रकरणे मंजूर करून शभंर एक कुटुंबांना लक्षाधीश बनवले आहे. या सर्व प्रा. शहाजी कांबळे सरांच्या आर्थिक मदतीमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक दलित लाभार्थी, दलित कुटुंबे आपले छोटे—छोटे उद्योग निर्माण करून आपली पोटे भरत आहेत. हे सर्व जमले आहे ते फक्त आणि फक्त प्रा. शहाजी कांबळे सरांच्यामुळेच.

एकूणच फुले—शाहू—आंबेडकरांचे विचार तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम प्रा. शहाजी कांबळे सरांनी केले आहे. त्यांनी कायद्याची बाजू घेवून आपल्या कार्यकर्त्यांला

आधार देण्याचे काम केले आहे. यामुळे कोल्हापूरच्या आंबेडकरी चळवळीमध्ये आज एक नवचैतन्य निर्माण झाले आहे.

दलित तरुणांच्या बाबतीत सरांचे असे विचार आहेत की 'दलित तरुणांनी आपले मन, मस्तक आणि मनगट शाबूत ठेवून प्रथम चांगल्या दर्जाचे शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण घेऊन झाल्यावर चांगल्या नोकऱ्या व उद्योगधंदे सुरू केले पाहिजेत. जेणेकरून आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुदृढ होईल. दलित चळवळीतील कार्यकर्त्यांने व नेत्याने कुठल्या दादा, बाबाकडे आर्थिक मदत मागू नये. दलितांच्यामधून आर्थिक मदत गोळा करावी. तसे झाले नाही तर हे सवर्ण दादा, बाबा आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर दलित चळवळ मारून टाकल्याशिवाय राहणार नाहीत. यामुळे दलित तरुणांनी नोकरी आणि स्वतंत्र व्यवसाय व उद्योगधंदा सुरू करावा व जिल्ह्याच्या पर्यायाने राज्याच्या व देशाच्या राजकारणात प्रवेश करावा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे माझी जमात शासनकर्ती जमात बनली पाहिजे हे स्वप्न पूर्ण करावे.' आर. पी. आय. च्या एकिकरणाविषयी बोलताना प्रा. शहाजी कांबळे म्हणाले 'भविष्यामध्ये जर आपल्याला राजकीय सत्ता हाती घ्यावयाची असेल तर आर. पी. आय.च्या सर्व गटा—तटांनी परस्परांवरील दावे विसरून एकत्र आले पाहिजे. पुढे इतर बहुजन समाजाला म्हणजेच ओबीसी बांधवांना बरोबर घेऊन निवडणूका लढवल्या पाहिजे व सत्तेच्या चाव्या आपल्या हातामध्ये घेतल्या पाहिजे. असे झाले तरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण होईल.

प्रा. शहाजी कांबळे यांच्या आंदोलनामध्ये पुढील काही निवडक आंदोलनांचा समावेश होतो, शासकीय वसतिगृहात नियमानुसार चांगले जेवण मिळावे यासाठी केलेले पहिले आंदोलन, कोल्हापूर जिल्ह्याच्या कलेक्टर ऑफिसवर जणांवरांसह काढलेला मार्चा, भारतीय दलित पँथरच्या माध्यमतून जिल्ह्याती केलेले वेगवेगळी आंदोलने, नामांतरासाठी केलेले आंदोलने, रिडल्सच्या संदर्भात केलेली आंदोलने, घाटकोपर रमाबाई आंबेडकरनगर गोळीबार प्रकरणी केलेले आंदोलन, खैरलांजी प्रकरण आंदोलन, वडिंगे, जि. कोल्हापूर प्रकरणी आंदोलन, मा. शालिनीताई पाटील यांनी आरक्षणाविरोधी घेतलेल्या भूमिकेविरूद्ध आंदोलन इ.

त्यांच्या या कार्याचा सत्कार ही मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. त्यांना विविध पुरस्कार मिळालेले आहेत, जसे, समाजभूषण पुरस्कार, उद्योग मित्र पुरस्कार, आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, **भिमरत्न** पुरस्कार, डिगे फौंडेशन इ.

**दलितमित्र प्रा. विश्वासराव गुंडू देशमुख :**

आंबेडकरी समाजपक्षाचे आरपीआय गवई गटाचे एक धडाडीचे, अभ्यासू, निस्वार्थी राजकीय नेतृत्व म्हणजे प्रा. विश्वासराव देशमुख होय. विश्वाससरांचा जन्म एका चांगल्या घरामध्ये इ. स. १९५७ ला झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गुंडू देशमुख तर आईचे नाव रत्नाबाई देशमुख होते. त्यांचे वडील सरकारी नोकरीला होते. तरीसुद्धा त्यांना आंबेडकरी विचार गप्प बसू देत नव्हते गुंडू देशमुख हे नोकरी करत करत समाजकार्य व राजकारण करत होते. मा. मंत्री श्रीपतराव बोंद्रे दादांचे ते कार्यकर्ते होते. म्हणजेच लहानपणापासूनच देशमुखसरांना वडीलांच्याकडूनच समाजकार्याचे व राजकारणाचे धडे मिळत गेले. देशमुख घराणे हे आंबेडकरी विचाराबरोबरच काँग्रेसच्या विचाराचे होते व हे घराणे काँग्रेसच्या विचाराने राजकारण करीत होते. इ. स. १९७५ पासून म्हणजे विद्यार्थी असतानाच देशमुखसरांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरवात केली. प्राध्यापकपेशा जरी स्वीकारला असला तरी देशमुख सरांनी कोल्हापूरच्या दलितांच्या बरोबरच इतर जातींतील जे

शेतकरी, शेतमजूर, गवंडी, विधवा आहेत यांच्या उत्थानासाठी, यांच्यामध्ये सामाजिक व राजकीय बदल घडवून आणण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून आपल्या कार्याला सुरवात केली. इ. स. १९८० च्या दशकामध्ये महाराष्ट्राबरोबरच कोल्हापूर जिल्ह्यामध्येही दलितांच्यावर सवर्णांच्याकडून अन्याय व अत्याचार होवू लागले. याला प्रतिकार करण्यासाठी प्रा. देशमुखसरांनी दलित पँथरच्या व काँग्रेसच्या माध्यमातून प्रयत्न केला. जिल्हाभर आंदोलने केली. राज्यात व दिल्लीमध्ये सुद्धा आंदोलन करून कोल्हापूरच्या पर्यायाने भारताच्या दलित, शोषितांच्याकडे सरकारचे लक्ष वेधले. पुढे रिडल्स व नामांतराच्या आंदोलनामध्ये उडी घेऊन स्वतला अटक करवून घेतली. त्यांनी दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला. ही सर्व आंदोलने करीत असताना नोकरीही सांभाळावी लागत होती. समाजाच्या प्रश्नासाठी त्यांना कित्येकदा तुरुंगात जावे लागले आहे.

समाजाची आर्थिक व शैक्षणिक प्रगती करावयाची असेल तर राजकारणाशिवाय पर्याय नाही म्हणून प्रा. देशमुखसरांनी गवईगटाचे कोल्हापूर जिल्ह्याचे नेतृत्त्व स्वीकारले व काँग्रेसच्या सहकार्याने त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी व करवीर तालुक्यामध्ये दलितांच्या अनेक संस्था काढून त्यांना मदत सुरू केली. तसेच शिक्षण संस्था, दूध संस्था, क्रेडीट सोसायटी व वडीलांच्या नावाने गुंडू देशमुख ट्रस्ट स्थापन करून आज दलित तरुणांना आपल्या परीने रोजगार उपलब्ध करून देत आहेत. भविष्यामध्ये आपल्या ट्रस्टच्या माध्यमातून गारमेंट हब किंवा एखादा मोठा प्रकल्प उभारून जिल्ह्यातील दलितांच्या बरोबरच इतर जातीतील गोर—गरीब मुलांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याची प्रा. विश्वासराव देशमुख सरांचा मानस आहे व त्या पद्धतीने सरकार दरबारी प्रयत्न करीत आहेत.

प्रा. विश्वासराव देशमुखांनी आपल्या तीस वर्षांच्या राजकारणामध्ये गवई गटाचे नेतृत्त्व करीत असताना जिल्ह्यामध्ये नेहमीच क्राँग्रेस पक्षाशी युती करून जातीयवादी पक्षाला शह देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वच काँग्रेस व राष्ट्रवादी आमदारांचे व त्यांचे चांगले राजकीय संबंध आहेत. त्यांनी दलित शेतकरी, शेतमजूर व कामगारांसाठीही भरीव काम केले आहे. एवढेच नव्हे तर रा. सु. गवई साहेबांच्या मदतीने मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, बाबासाहेब भोसले, शरद पवार, अशोकराव चव्हाण या मुख्यमंत्र्याच्या बरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांच्याबाबत नेहमीच चर्चा करून तसेच त्यांना जिल्ह्यातील दलितांच्या प्रश्नांचे मेमोरँडम देवून दलितांचे प्रश्न सोडविण्याचा सरांनी मोठा प्रयत्न केला आहे.

त्यांच्या प्रमुख कार्यामध्ये पुढील प्रमुख कामाचा समावेश करता येईल. गेल्या ४० वर्षापासून जिल्ह्यामध्ये मुंबईमध्ये व दिल्लीमध्ये जातीयवादी विरोधी वेळोवेळी आंदोलने, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मंदिर प्रवेश व पाणवठा वापराबाबत वेळोवेळी आंदोलने, १९८०—९४ दरम्यान नामांतराच्या आंदोलनामधील सहभाग, १९८७ च्या रिडल्स आंदोलनामध्ये सहभाग, १९८८ साली भोगावती साखर कारखान्याचे शेअर्स दलित शेतकऱ्यांना मिळावे यासाठी आंदोलन, देवस्थान जमिनी दलितांना मिळाव्यात यासाठी आंदोलन, सहकारी संस्थामधील दलितांचा अनुशेष भरावा यासाठी आंदोलने, १९८९ मध्ये पंचशील शिक्षण संस्थेच्या माध्यमातून दलितांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न, १९९० मध्ये महात्मा फुले ग्रामीण को—क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून दलित शेतकऱ्यांना अल्पव्याजदरामधून कर्ज इ. ही झाली दलितांच्या उत्थानासाठी केलेली आंदोलने.

त्यांनी, दलित्तेतर सामान्य लोकांसाठीसुध्दा मोठे कार्य केलेले दिसून येते. जसे, विविध गावांमध्ये सहकारी तत्वावरील दूध डेअरीची स्थापना, १९०६ पासून ग्रामीण भागात आरोग्य शिबरे, असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी जनश्री लाईफ इन्शुरन्सची मंजूरी, १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टया कायम रहाव्यात यासाठी आंदोलने, महिला बचत गट—निराधार—पूरग्रस्त यांच्यासाठी प्रयत्न इ.

त्यांच्या या कार्यामुळे शासनाने त्यांना २००८—९ चा दलितमित्र पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे.

**समारोपः**

भविष्यामध्ये जर आंबेडकरी चळवळ जिवंत ठेवायची असेल तर सर्व आरपीआय गट—तटांनी व आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्यानी मतभेद व इगो बाजूला सारून एकत्र आले पाहिजे. नाहीतर जे इतर मोठे पक्ष आहेत ते आंबेडकरी समाजपक्षाला आमीषे दाखवून आपल्यामध्ये मर्ज करतील व आंबेडकरी चळवळच मोडीत काढतील याचे भान ठेवावे.

**संदर्भसूर्ची**

१. कांबळे, आर. आर., रिपब्लिकन पक्ष उदय आणि विकास, प्रकाशन निर्मिती संवाद, कोल्हापूर, जानेवारी २०१३, पृ. १००
२. तत्रैव
३. कित्ता, पृ. १०१
४. ठिकपुर्ले बंडोपंत चर्चावजा मुलाखत, दि. १४ एप्रिल २०१६
५. प्रा. डॉ. कांबळे आर. आर., उपरोक्त, पृ. १०२
६. मा. जयवंतरावजी आवळे यांची मुलाखत, दि. ३ जानेवारी २०१६
७. मा. राजीव आवळे यांची मुलाखत दि. १० जानेवारी २०१६
८. मा. सुजीत मिणचेकर दि. १७ जानेवारी २०१६
९. मा. प्रा. शहाजी कांबळे दि. २४ जानेवारी २०१६
१०. मा. विश्वासराव गुंडू देशमुख दि. ३१ जानेवारी २०१६